# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.३२००/२०२१/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.खंडू निवृत्ती बेंडकोळी,<br>रा.मु.पो.धोंडेगाव,<br>ता.जि.नाशिक. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव.<br>ता.जि.नाशिक. | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),<br>पंचायत समिती, नाशिक.<br>ता.जि.नाशिक. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

१) २०२०-२१ दलित वस्ती सुधारणा ठराव प्रती.
२) २०२०-२१ रस्ते, गटारी, पाणी योजना या कामांच्या ठराव प्रती.
३) केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्याकडून आलेला निधी, वापरलेला निधी, उर्वरित निधी यांची माहिती (प्रती) देणे.
४) २०२०-२१ डेडस्टॉक रजिस्टर प्रती देणे.
५) २०१९-२० ऑडीट रिपोर्ट प्रति मिळणेबाबत.
६) २०२०-२१ कामांच्या व्यवहार नोंदी प्रति तसेच झालेली कामे इस्टीमेट, वर्क ऑर्डर, ठराव प्रती मिळणेबाबत.
७) ग्रामपंचायत कर्मचारी संख्या व त्यांचे वेतनश्रेणी किती (मासिक) व पदनाम यांच्या विषयी माहिती देणे.
८) २०२०-२१ १४ व्या १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रती देणे.
९) २०२०-२१ ग्रामनिधी जमा, खर्च, शिल्लक निधी प्रती मिळावेत.
१०) दलित वस्ती करीता २०२०-२१ प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रती मिळणेबाबत.
११) २०२०-२१ पेसा आयोगाअंतर्गत प्राप्त निधी, खर्च, शिल्लक निधी प्रती देणेबाबत.

वरील दस्तऐवज प्रती मिळावेत. सदर पाहणीसाठी मला व माझा एक प्रतिनिधी यांना पत्राद्वारे वेळ व तारीख देण्यात यावी.

सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.०२/०८/२०२२ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगाव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. अपिलार्थी यांच्या दि.०३/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव ता.जि.नाशिक यांनी दि.२३/०७/२०२१ च्या पत्रान्वये आपल्या अर्जात नमूद केलेप्रमाणे अर्जात अनेक विषय असलेने प्रथम विषयाची माहिती एकूण २ प्रती असून एकूण छायांकित प्रतीचे ४ रुपये व पोस्टाचा खर्च रु.२५/- असे एकूण रु.२९/- लेखाशिर्ष ००७०-प्रशासनिक सेवा, ६० इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) या लेखाशिर्ष वर रु.२९/- भरुन आपण मागणी केलेली माहिती कार्यालयीन वेळेत घेऊन जावी असे अपिलार्थीस कळविले असून सदर पत्राची प्रत प्रथम अपिलीय अधिकारी तथा

गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती, नाशिक तसेच मुख्याध्यापक, फ्रावशी इंटरनॅशनल ॲकेडमी, गंगापूर-दुगांव रोड, दुगांव, नाशिक यांना माहितीकरिता दिलेली दिसून येते. याव्यतिरिक्त द्वितीय अपिल सुनावणीवेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगाव ता.जि.नाशिक उपस्थित असून त्यांनी दि.२३/०७/२०२१ रोजीच्या पत्राची प्रत मुख्याध्यापक, फ्रावशी इंटरनॅशनल ॲकेडमी, गंगापूर-दुगांव रोड, दुगांव, नाशिक यांना का पाठविली याबाबत काहीही सांगितल्याचे दिसून येत नाही. वास्तविक तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव ता.जि.नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने शुल्क भरण्याबाबतचे पत्राची प्रत मुख्याध्यापक, फ्रावशी इंटरनॅशनल ॲकेडमी, गंगापूर-दुगांव रोड, दुगांव, नाशिक यांना त्यांचा याप्रकरणाशी कोणताही संबंध नसतांना त्यांना चिन्हांकित केल्याचे दिसून येते.

३. आयोगाने उपलब्ध अभिलेखाचे परिक्षण केले असता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगाव ता.जि.नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम विषयाची माहिती शुल्क आकारुन दिली आहे. सदर प्रकरणात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगाव ता.जि.नाशिक यांनी शुल्क मागणी पत्र निर्गमित करतांना काही प्रक्रियात्मक किंवा तांत्रिक त्रुटी झाल्याचा आरोप आहे. तथापि, या त्रुटी जाणीवपूर्वक, दुर्भावनेने किंवा अर्जदाराची दिशाभूल करण्याच्या हेतूने करण्यात आल्याचे ठोस पुरावे अभिलेखावर दिसून येत नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० अंतर्गत दंडात्मक कार्यवाही ही अर्ध-फौजदारी स्वरुपाची असून ती यांत्रिक पध्दतीने लावता येत नाही. दंड लावण्यासाठी जन माहिती अधिका-याने जाणीवपूर्वक चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे स्पष्टपणे सिध्द होणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात तशी कोणतीही बाब सिध्द होत नसल्याने, केवळ प्रक्रियात्मक / प्रामाणिक चूक या आधारावर जन माहिती अधिका-यावर कलम २० अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करणे योग्य ठरत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर दंड प्रस्तावित करण्याची आवश्यकता नाही. तथापि, जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तसेच त्या अंतर्गत नियमानुसार शुल्क मागणी, कालमर्यादा व माहिती पुरवठा याबाबत अधिक दक्षता बाळगावी. अशा प्रकारच्या प्रक्रियात्मक त्रुटी पुनरावृत्त होऊ नये यासाठी आवश्यक ती काळजी घेण्याचे निर्देश आयोग देत आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोंडेगांव ता.जि.नाशिक (श्री.चंद्रकांत शांताराम भोये) यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.३२००/२०२१/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जावक क्र. २०४६ दिनांक :- 23 MAR 2026